# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०४/०९/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे महाविद्यलयीन तरुण/तरुणींसाठी पोलीस/सैनिक भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीरास सुरुवात

---

नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्चशिक्षित व महाविद्यालयीन तरूण-तरूणींचा शासकिय नोक-यांकडे कल वाढत असुन स्पर्धा परिक्षा तसेच पोलीस/सैनिक भरतीसाठी तयारी करतांना विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे संकल्पनेतुन जिल्हयातील महाविद्यालयीन तरूण-तरूणींसाठी जातीय सलोखा अंतर्गत **पोलीस/सैनिक भरतीपुर्व प्रशिक्षण २०१८-१९ शिबीरास** आज रोजीपासुन सुरूवात झाली आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धेदरम्यान सदर प्रशिक्षण शिबीरांचे उद्घाटन करण्यात आले होते. सन २०१८-१९ मध्ये राज्यात होणा-या विविध भरती प्रक्रियांसाठी महाविद्यालयीन तरूणांकरीता सदर भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीर राबविले जाणार असुन भरतीतील उमेदवारांना मार्गदर्शन मिळावे, तसेच त्यांचा सराव व्हावा यासाठी जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांअंतर्गत सदर भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीर वर्षभर सुरु राहणार आहे. सदर शिबीरादरम्यान महाविद्यालयीन तरुण-तरुणींना नाशिक ग्रामीण पोलीस दलातील राष्ट्रीय व राज्यस्तरीय पोलीस खेळाडुंमार्फत मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आज रोजी पेठ तालुक्यातील दादासाहेब बिडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पेठ येथे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. यांचे प्रमुख उपस्थितीत भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीरास सुरूवात झाली. यावेळी पेठ उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. सचिन गोरे, पोलीस निरीक्षक श्री.लिलाधर कानडे पेठ पो.स्टे. तसेच डांग सेवा मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती हेमलताताई बिडगर, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.बी.टोचे यांचेसह सुमारे ३०० विद्यार्थी उपस्थित होते. मा.पोलीस अधीक्षक सो यांनी महाविद्यालयातील उपस्थित असलेले विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा तसेच पोलीस/सैनिक भरतीप्रक्रीये संदर्भात मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील तरूणांनी स्पर्धा परिक्षांव्दारे प्रशासकिय अधिकारी होवुन उत्तुंग भरारी घ्यावी यासाठी त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देण्यात आले. जिल्हयातील पोलीस ठाण्यांनिहाय महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणा-या भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीरामुळे पोलीस व जनता यांच्यात सुसंवाद निर्माण होवुन पोलीसांची प्रतिमा अधिक सुधारली जाणार आहे.

तसेच सदर शिबीरादरम्यान मालेगाव विभागाचे **अपर पोलीस अधीक्षक श्री. निलोत्पल सो** यांनीही आज रोजी मालेगाव शहरातील एम.एस.जी. कॉलेजमधील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा तयारी तसेच पोलीस / सैनिक भरती प्रक्रीये दरम्यान येणा-या समस्या समजावुन सांगुन मार्गदर्शन केले. यावेळी मालेगाव शहर उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. रत्नाकर नवले, व कॅम्प उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. अजित हगवणे यांचेसह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो** यांनी निफाड तालुक्यातील सायखेडा येथील स्वामी षट्कोपाचार्य महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांची तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले तसेच पोलीस / सैनिक भरती प्रक्रिये दरम्यान शारिरीक/मैदानी चाचणीत होणारे विविध घटकांची माहिती दिली व पोलीस खेळाडूंमार्फत मैदानी चाचणीचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. यावेळी निफाड उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. माधव पडीले, सायखेडा पो.स्टे. चे पोलीस निरीक्षक श्री. अंबादास मोरे यांचेसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

तसेच कळवण उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे यांनीही कळवण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिबीरादरम्यान मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. ओझर येथील एच.ए.एल.कॉलेज येथे आयोजित केलेल्या भरतीपुर्व प्रशिक्षणा दरम्यान नाशिक ग्रामीण उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. अतुल झेंडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पोलीस /सैनिक भरतीतील शारिरीक चाचणीतील विविध चाचण्यांची माहिती देवुन सविस्तर मार्गदर्शन केले. मनमाड उपविभागाच्या सहा.पोलीस अधीक्षक श्रीमती आर. रागसुधा मॅडम तसेच मालेगाव ग्रामीण उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री. शशिकांत शिंदे यांनीही उपविभागातील पोलीस ठाण्यांअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धापरिक्षा तयारी, तसेच पोलीस/सैनिक भरतीतील अभ्यासक्रम व शारिरीक चाचणी दरम्यान येणा-या अडचणींचे निरसन करून मार्गदर्शन केले.

नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेअंतर्गत आज रोजीपासुन सदर भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीरास सुरूवात झाली असुन महाविद्यालयांचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेशी संपर्क साधुन तारीख व वेळ निश्चित करून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्हयातील एकुण २८ महाविद्यलयांमध्ये सदरचे प्रशिक्षण पार पडणार असुन जास्तीत जास्त तरूणांनी सहभाग नोंदवुन शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.